# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

## (विद्यार्थी विकास विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी कार्यालय: ०७१२–२४३३२८६


क्रमांक: रातुमनावि/विविवि/१८/स/
दिनांक : सप्टेंबर २०१८

## सुधारित परिपत्रक

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक
३. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखाप्रमुख

विषय: स्वामी विवेकानंद यांनी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेमध्ये केलेल्या ऐतिहासिक भाषणाचे वाचन करण्याबाबत.

संदर्भ: क्रमांक रातुमनावि/साप्र/१८/स/२७०८, दिनांक १ सप्टेंबर २०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकीत संदर्भिय परिपत्रकात नमूद केलेल्या मजकुराऐवजी सुधारित मजकुर कृपया खालील प्रमाणे वाचण्यात यावा, ही विनंती.

आपणास कळविण्यात येते की, दिनांक ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदांच्या ऐतिहासिक भाषणाच्या शतकोत्तर रौप्य (१२५ वर्ष) महोत्सव **'दिग्विजय दिवस'** म्हणून विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचे व त्यानिमित्ताने स्वामी विवेकानंदांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेमध्ये केलेल्या ऐतिहासिक भाषणाचे वाचन दिनांक ११ सप्टेंबर २०१८ रोजी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील/ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याचे दिनांक ३० ऑगस्ट २०१८ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने ठरविले आहे.

त्यानुसार मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये आपणास विनंती करण्यात येते की, दिनांक ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदांच्या ऐतिहासिक भाषणाच्या शतकोत्तर रौप्य (१२५ वर्ष) महोत्सव **'दिग्विजय दिवस'** म्हणून आपल्या विभागात/महाविद्यालयात साजरा करण्यात यावा. स्वामी विवेकानंद यांनी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेमध्ये केलेल्या ऐतिहासिक भाषणाची प्रत (मराठी व इंग्रजी) आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत असून सदर भाषणाचे सामुहिक वाचन **दिनांक ११ सप्टेंबर २०१८ रोजी** आपल्या विभागातील/महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत करून त्याबाबतचा अहवाल छायाचित्रासह संचालक, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचेकडे पाठवावा.

आपला

(डॉ. दिलीप कावडकर)
संचालक, विद्यार्थी विकास



## ११ सप्टेंबर स्वामी विवेकानंद दिग्विजय दिवस

### ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरीकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदांच्या ऐतिहासिक भाषणाचा शतकोत्तर रौप्य (१२५ वर्ष ) महोत्सव

अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो,

आपल्या प्रेमळ व उत्स्फूर्त स्वागतानं माझं हृदय भरून आलं आहे. या स्वागताबद्दल मी जगातील सर्वात प्राचीन परंपरेच्या वतीनं आपले आभार मानतो. सर्व धर्मांची जननी असलेल्या, सर्व जाती, पंथांच्या लाखो, करोडो हिंदूंच्या वतीनं आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. पूर्वेकडील देशांकडून सहिष्णुतेचा विचार जगाला मिळाला आहे,असं या व्यासपीठावरून सांगणाऱ्या वक्त्यांचेही आभार नतो.

जगाला सहिष्णुता व सर्वसमावेशकतेचा संदेश देणाऱ्या धर्माचा एक भाग असल्याचा याचा मला अभिमान आहे. आम्ही केवळ सर्वसमावेशकता आणि सहिष्णुतेवरच विश्वासच ठेवतो असं नाही तर जगातील प्रत्येक धर्माचा सत्य म्हणून स्वीकार करतो. जगाच्या पाठीवरील सर्व देशांतील आणि धर्मांतील पीडित व गांजलेल्या लोकांना आश्रय देणाऱ्या देशाचा नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. रोमन हल्लेखोरांनी ज्यांच्या धर्मस्थळांची तोडफोड केली, त्या इस्रायलींनीही दक्षिण भारतातच आश्रय घेतला होता. त्या सर्वांच्या स्मृती आम्ही आमच्या हृदयात आजही जपून ठेवल्या आहेत. महान पारशी धर्माच्या लोकांना शरण देणाऱ्या व आजही त्यांचं पालन-पोषण करणाऱ्या धर्माचा मी एक भाग आहे, याचाही मला सार्थ अभिमान आहे.

बंधूंनो, लहानपणापासून मी ऐकलेल्या आणि मुखोद्गत केलेल्या एका श्लोकाच्या ओळी आपल्याला ऐकवण्याची माझी इच्छा आहे. कोट्यवधी लोक आजही या ओळींचं पारायण करतात. 'ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्या वेगवेगळ्या ठिकाणी उगम पावून अखेरीस समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे माणूस आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो. हे मार्ग सरळ असो की वाकडे- तिकडे,ते शेवटी भगवंतापर्यंतच जातात.

'जो माझ्यापर्यंत येतो, तो कसाही असो, मी त्याचा स्वीकार करतो. कुणी कुठलाही मार्ग निवडो, अखेरीस माझ्यापर्यंतच येतो'. आजची ही पवित्र परिषद भगवद्गगीतेमधील या सिद्धांताचाच पुरावा आहे.

सांप्रदायिकता, कट्टरता, कर्मठता आणि धर्मांधतेनं बऱ्याच काळापासून पृथ्वीला आपल्या पंजात जखडून टाकलं आहे. या साऱ्यांनी पृथ्वीला हिंसाचारानं भरून टाकलं आहे. अनेकदा ही पृथ्वी रक्तानं लाल केलीय. कितीतरी संस्कृतींचा नाश केला आहे आणि कितीतरी देश गिळून टाकले आहेत. हे राक्षस नसते तर मानवसमाज आज कितीतरी विकसित झाला असता. मात्र, आता या राक्षसांचे दिवस भरले आहेत. मला विश्वास आहे ही परिषद सर्व प्रकारची धर्मांधता, सर्व प्रकारच्या वेदना (मग त्या तलवारीनं झालेल्या असोत की लेखणीनं) आणि माणसा-माणसांमधील सर्व प्रकारच्या दुर्गुणांचा संहार करेल.



# 11 September Swami Vivekananda *Digvijay Divas*

## 125th anniversary of Swami Vivekananda's historic speech on 11 September 1983 at the 'Parliament of the World's Religions' in Chicago

Sisters and Brothers of America!!!

It fills my heart with joy unspeakable to rise in response to the warm and cordial welcome which you have given us. I thank you in the name of the most ancient order of monks in the world; I thank you in the name of the mother of religions; and I thank you in the name of the millions and millions of Hindu people of all classes and sects. My thanks, also, to some of the speakers on this platform who, referring to the delegates from the Orient, have told you that these men from far-off nations may well claim the honour of bearing to different lands the idea of toleration. I am proud to belong to a religion which has taught the world both tolerance and universal acceptance. We believe not only in universal toleration, but we accept all religions as true. I am proud to belong to a nation which has sheltered the persecuted and the refugees of all religions and all nations of the earth. I am proud to tell you that we have gathered in our bosom the purest remnant of the Israelites, who came to the southern India and took refuge with us in the very year in which their holy temple was shattered to pieces by Roman tyranny. I am proud to belong to the religion which has sheltered and is still fostering the remnant of the grand Zoroastrian nation. I will quote to you, brethren, a few lines from a hymn which I remember to have repeated from my earliest boyhood, which is every day repeated by millions of human beings:

As the different streams having there sources in different places all mingle their water in the sea, so, O Lord, the different paths which men take through different tendencies, various though they appear, crooked or straight, all lead to Thee.

The present convention, which is one of the most august assemblies ever held, is in itself a vindication, a declaration to the world, of the wonderful doctrine preached in the Gita:

Whosoever comes to Me, through whatsoever form, I reach him; all men are struggling through paths which in the end lead to Me. Sectarianism, bigotry, and their horrible descendant, fanaticism, have long possessed this beautiful earth. They have filled the earth with violence, drenched it often and often with human blood, destroyed civilization, and sent whole nations to despair. Had it not been for these horrible demons, human society would be far more advanced than it is now. But their time is come; and I fervently hope that the bell that tolled this morning in honour of this convention may be the death-knell of all fanaticism, of all persecutions with the sword or with the pen, and of all uncharitable feelings between persons wending their way to the same goal.